लोकमत

# राजन गवस यांची आज मुलाखत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे आयोजित 'लेखक-संवाद' या कार्यक्रमांतर्गत मराठी साहित्यविश्वातले ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांची डॉ. गोविंद काजरेकर यांनी विशेष मुलाखत घेतली आहे. शनिवारी (दि. २८) सायंकाळी सात वाजता ही मुलाखत 'शिव वार्ता' या वाहिनीवरून प्रसारित करण्यात येणार आहे.

पुढारी

# ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांची विशेष मुलाखत

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने आयोजित 'लेखक-संवाद' या कार्यक्रमांतर्गत मराठी साहित्य विश्वातले ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. राजन गवस यांची डॉ. गोविंद काजरेकर यांनी विशेष मुलाखत घेतली आहे. शनिवारी (दि. २८) सायंकाळी ७ वाजता ही मुलाखत विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या वाहिनीवरून प्रसारित करण्यात येणार आहे.

पुढारी

# विद्यापीठ कौशल्य, उद्योजकता विकास केंद्रातर्फे ८ सप्टेंबरला व्याख्यानमाला

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, पाथसिड्स एज्युकेशन इन्स्टिटट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने ८ सप्टेंबर रोजी एकदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. पाथसिड्स एज्युकेशन इन्स्टिटट्यूटचे संचालक सलिल राजगुरू हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

सकाळ

# मेघा पानसरे, चंपानेरकर यांना बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार

## आंतरभारती अनुवाद केंद्रातर्फे 'भाषांतरकार'ने गौरव

कोल्हापूर, ता. २७ : २०१९ चा बाळशास्त्री जांभेकर भाषांतर पुरस्कार डॉ. मेघा पानसरे यांच्या 'सोविएत रशियन कथा' पुस्तकाला, तर २०२० चा पुरस्कार प्रफुल्ल बिडवई लिखित 'भारतातील डाव्या चळवळींचा मागोवा' पुस्तकाच्या भाषांतरासाठी मिलिंद चंपानेरकर यांना जाहीर झाला. पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे उत्कृष्ट भाषांतरकाराला दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित विंदा करंदीकर यांनी पुरस्कारासाठी आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्राला दिलेल्या देणगीतून पुरस्कार देण्यात येतो. पुरस्कारासाठी त्या वर्षीच्या प्रकाशन वर्षासह आधीच्या दोन वर्षातील पुस्तकेही विचारात घेतली जातात. कोविडमुळे पुरस्कार जाहीर करता आले नव्हते.

डॉ. पानसरे रशियन भाषेच्या तीस वर्षे अभ्यासक आहेत. संग्रहासाठी आवश्यक पार्श्वभूमी सांगणारी संक्षिप्त प्रस्तावना, प्रत्येक लेखकाचा कथेआधी परिचय आणि रशियन साहित्याचा एकोणिसाव्या शतकापासून समकालीन साहित्याच्या



मेघा पानसरे



मिलिंद चंपानेरकर

अवस्थेपर्यंतचा विश्लेषक इतिहास सांगणारे परिशिष्ट यातून जागतिक कथा साहित्याचा अभ्यास करणाऱ्या, त्यात आस्था असलेल्या मराठी वाचकाला एका भाषेतील कथासाहित्याचा एक पट सापडतो. मूळ भाषेतील लहेजा जाणवून देताना लक्ष्य भाषेतील सहजपणा भाषांतरात साधलेला दिसतो. पानसरे यांनी वेरा पानोवा यांचे पुस्तक 'सिर्योझा', मक्सिम गोर्की यांचे 'तळघर' तसेच आत्मजीतसिंह यांचे 'सारंगी' हे नाटक भाषांतरित केले आहे.

चंपानेरकरांनी यापूर्वी 'लोकशाहीवादी अम्मीस दीर्घ पत्र', 'गुड मुस्लिम, बॅड मुस्लिम', 'ग्रेप्स ऑफ रॉथ' या गाजलेल्या पुस्तकांसह अनेक पुस्तके भाषांतरित केली आहेत. या पुस्तकांची निवड प्रफुल्ल शिलेदार, प्रा. सुनंदा महाजन, प्रा. रणधीर शिंदे व डॉ. नीतीन रिंढे यांच्या समितीने केली.

तरुण भारत

# डॉ. राजन गवस यांची आज 'शिववार्ता'वर मुलाखत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'लेखक-संवाद' या कार्यक्रमातर्गत मराठी साहित्य विश्वातील ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत साहित्य अकादमी पुरस्कार विजेते डॉ. राजन गवस यांची डॉ. गोविंद काजरेकर यांनी मुलाखत घेतली आहे. शनिवार २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता ही मुलाखत शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता वाहिनीवरून प्रसारित करण्यात येणार आहे.



- **जडणघडण आणि साहित्यातील प्रवास उलगडणार**

या मुलाखतीत डॉ. गवस यांनी आपली जडणघडण आणि साहित्यातील प्रवास सांगितला आहे. साहित्यप्रेमींनी या मुलाखतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आहे. **https://youtu.be/5g0nNBZ5Y_k** या लिंकवर ही मुलाखत साहित्यरसिकांना पाहता येणार आहे...